दिव्य मराठी

# अकोला 10-10-2024

# मोबाइलचे लोकेशन शेअर करणे धोकादायक ठरू शकते : न्या. अस्मर

## विद्यार्थ्यांनी सावध राहावे; पटेल महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागृती मोहीम

**प्रतिनिधी | भंडारा**

आपल्या मोबाईलमधील कुठल्याही ॲपला परमिशन देताना दोनदा विचार करावा. कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता इंटरनेट आणि विविध टेक्नॉलॉजीचा जबाबदारीपूर्वक वापर करावा. विद्यार्थ्यांनी कुठल्याही खासगी गोष्टी, फोटो अथवा लोकेशन कोणालाही शेअर करू नये. त्याचप्रमाणे चॅटिंग करतानासुद्धा मर्यादा पाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अशा गोष्टी टाळायला हव्यात, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांनी केले. जे. एम. पटेल कॉलेजमध्ये


सायबर सुरक्षा मोहिमेत मार्गदर्शन करताना न्या. अस्मर व अन्य.

सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणे देत सायबर गुन्ह्यांबाबत अवगत केले. यात गुन्ह्याचे स्वरूप, त्याची कारणे, परिस्थिती, व्याप्ती याबाबत जाणीव करून दिली.

प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव बिजू गवारे प्रामुख्याने उपस्थित होते. यप्रसंगी प्राचार्य डॉ विकास ढोमणे यांनी अध्यक्षीय भाषणात वर्धमान ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे ओसवाल यांच्यासोबत घडलेल्या सायबर गुन्ह्याची सविस्तर माहिती दिली. त्याचसोबत इस्त्राईल-लेबनान युद्धामध्ये होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराची माहिती दिली. यप्रसंगी सायबर पोलिस स्टेशनचे हवालदार दिनेंद्र आंबेडारे तसेच डॉ. कार्तिक पनीकर, डॉ. प्रविण घोसेकर, डॉ. सबाह नसीम, पलाश फेंदेवार, प्रियंका शर्मा, फरीना शेख उपस्थित होते.